The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत तुकारामांच्या अभंगातील कालसंवादी रचनात्मक आणि व्यवहार्य विचारांची प्रासंगिकता

**प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे,**

मराठीविभाग, शिवजागृती महाविद्याल यनळेगाव, ता. चाकूरजि. लातूर

तुकाराम महाराजांचे विचार कालसंवादी असून आजच्या काळात प्रासंगिक आहेत. प्रत्येक काळात विचार उपयोगी पडतात. सदाचार व दुराचार सद्‌विचार व दुर्गुणविचार याचे सतत युद्ध असते.त्रेतायुगात रामही होता आणि रावणही होता. धर्मअधर्म प्रत्येक काळात असतो. नेहमी विजय सत्याचा होतो. सदाचाराचा मार्ग सर्व महात्म्यांनी व धर्मग्रंथांनी जनसामान्यांना सांगितला आहे. आपल्या विहित कर्माने नित्यरत राहून स्वधर्माच्या आचरणाने मोक्ष प्राप्ती करणे हेच प्रत्येक मानवाचे ध्येय असले पाहिजे. चित्तशुद्धी, लोकसंग्रह, ईश्वरअर्पण, बुद्धी, विश्वकल्याणाची इच्छा हेच कर्म करण्याचे हेतू असले पाहिजेत. यालाच सदाचार असे म्हणतात. यालाच नीती असे म्हणतात. सत्तप्रवृत्ती, सदाचारण, सारासार विवेक, अहिंसा, सत्य, असतेय इत्यादी गुण व अंतिम ध्येयाकडे नेणारा मार्ग इत्यादी गोष्टी नीती या शब्दाने दर्शित होतात.'सत्यमेव जयते' असे म्हटले जाते. ज्या बाजूने भगवंत त्या बाजूने विजय होतो भगवद्‌गीतेत आपण कोणते कार्य करावे व कोणते करू नये. असा मोह अर्जुनाला झाला होता. अर्जुनाला नितीशास्त्राच्या मार्गाचे यथार्थ दर्शन भगवान श्रीकृष्णांनी केले व त्याच्या मनातील मोह नाहीसा केला. आपल्या वाट्याला आलेले कर्म उत्तम रीतीने करणे, निष्काम बुद्धीने करणे यालाच सदाचाराचा मोक्षाप्रत नेणारा मार्ग असे म्हणतात. सदाचार हा जाणीवपूर्वक, कष्टपूर्वक अंगी बाणवावा लागतो. भगवद्‌गीतेत म्हटले आहे की, भगवंताच्या न्यायालयात सत्याचा विजय होतो. समाजात सज्जन व दुर्जन या दोन्ही प्रकारचे लोक असतात दुष्ट प्रवृत्तीचे लोक समाजात असतील तर, अशांतता निर्माण होते. त्यासाठी संतांचे विचार आवश्यक आहेत. भौतिक सृष्टी बदलली, पण मनोसृष्टीतील लोभ, दंभ,द्वेष, क्रोध, व्याभिचार, मातृद्रोह, वचनभंग, क्रौर्य याचा, अहंकार, काम हे दुर्गुण माणसातील गेले नाहीत, तर हे दुर्गुण नष्ट करण्यासाठी संतांचे विचार आवश्यक आहेत. त्याग, संयम, दया, क्षमा, शांती, सत्यनिष्ठा इत्यादी सद्‌गुणांची शिकवण संतांनी दिली. हे सदगुणांनी संपन्न असलेल्या मनुष्याला समाजाने नेहमी वंदनीय मानले आहे.

तुकारामांनी आपल्या अभंगातून त्या काळात मांडलेले विचार आजही सामाजिक समरसता यासाठी महत्त्वाचे आहेत. समाजातील भेदभाव कसा नाहीसा होईल यासाठी संतांनी समतेचा विचार मांडला. सर्व मानव एकच आहेत. ही विश्वबंधुत्वाची कल्पना संतांनी मांडली आहे. चंद्रभागेच्या वाळवंटात सर्व जाती, धर्मांच्या पंथांच्या, लोकांना एकत्र करण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांनी केले. संत नामदेव 'नाचू कीर्तनाची रंगी| ज्ञानदीप लावू जगी||' असे

म्हणतात. संत तुकाराम 'बुडती हे जन न देखवे डोळा| म्हणूनी येतो कळवळा||' अशी तुकोबांची विचारसरणी मननीय आहे.

**"उंचनीच काही नेणे भगवंत| तिष्टे भावभक्त देखोनिया|| दासीपुत्र कन्या विदुराच्या भक्षी| दैत्या घरी रक्षी प्रल्हादासी|| चर्म रंगू लागे रोहदासासंगे| कबीराचे मागे शेली विणी|| सजन कसाया विकू लागे मांस| माळ्या सावत्यास खुरपूं लागे|| नरहरी सोनार घडूं फुंकू लागे| चोखामेळ्यासंगे ढोरे ओढी|| नाम्याची जनी सवे वेची सेणी| धर्म घरी पाणी वाहे झाडी|| नाम्यासवे जेवी नव्हे संकोचित| ज्ञानियाची भिंत अंगेओढी|| अर्जुनाचे रथी होय हा सारथी| भक्षिपोहे प्रीती सुदाम्याचे||गौळीयांचे घरी आंगे गाई वळी| द्वारपाळ बळी द्वारी झाला|| एंकोबाचे ऋणफेडी ऋषिकेशी| अंबऋषीचे सोशी गर्भवास|| मीराबाईसाठी घेतो विष प्याला| दामाजीचा झाला पाडेवार||घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची|| हुंडी मेहत्याची अंगे भरी|| पुंडलिकासाठी अर्जुनितिष्टत| तुका म्हणे माता धन्य त्याची||"**

हा भक्त उच्च जातीचा आहे. हा नीच जातीचा आहे. असे पांडुरंग पहात नाही. केवळ शुद्ध भाव पाहूनच त्या भक्ताची सेवा करण्यास प्रवृत्त होतो विदूर हा दासी पुत्र पण त्याच्या कण्या खातो. हिरण्यकश्यपूच्या घरी प्रल्हादाचे सर्वतोपरी रक्षण करतो. रोहिदास चांभाराबरोबर काकडे रंगू लागतो. कबीराच्या मागावर शेले विणतो. सज कसायाबरोबर मांस विकू लागतो. सावता माळ्याबरोबर त्याचा मळा खुरपूं लागतो. नरहरी सोनाराबरोबर दागिने घडवू लागतो व भातंफुंकू लागतो. चोखामेळाबरोबर मेलेली ढोरं ओढतो. नामदेवाच्या जनीबरोबर गोवऱ्या वेचू लागतो. धर्मराजाच्या घरी पाणी वाहतो आणि घरे झाडतो. नामदेवाबरोबर जेवताना त्याला संकोच वाटत नाही ज्ञानदेवांची भिंत स्वतः ओढतो अर्जुनाच्या रथावर हा पांडुरंग सारथी होतो तर सुदामाचे पोहे आवडीने खातो नंदाच्या घरी स्वतः गायी वळतो आणि बळीराजाच्या द्वारी हा भगवान द्वारपाल झाला. एकनाथाच्या भक्तीचे ऋण फेडण्याकरिता हा ऋषिकेशी गंगेचे पाणी कावडीने आणतो. अंबरूऋषीकरिता गर्भवास सोसतो. मीराबाईला जगविण्याकरिता तिला पिण्यास दिलेला विषाचा पेला स्वतः घेऊन ते विष पिऊन टाकतो. दामाजीची रक्कम पटविण्याकरिता त्याचा बिगारी महार झाला. गोऱ्या कुंभाराची गाडगी घडवितो व त्याकरिता डोक्यावर माती वाहतो. नरसी मेहताची हुंडी ज्याने स्वतः भरली तुकाराम महाराज म्हणतात, तोच भगवान पुंडलिकासाठी अजूनही पंढरीत उभा आहे त्याचीही कथा धन्य होय."या रे या लहान थोर" याही अभंगात सकाळांसी आहे येथे सर्वांना समान अधिकार असे म्हणतात. कोणीही श्रेष्ठ व कनिष्ठ नाही. हा विचार संतांनी ७०० वर्षापूर्वी मांडला आहे. अध्यात्मिक लोकशाही संतांनी निर्माण केली. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता ही मूल्ये संतांनी निर्माण केली आहेत.

**"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म|भेदाभेद भ्रम अमंगळ|| आईकाजी तुम्ही भक्त भागवत| कराल ते हित सत्य करा|| कोणाही जीवाचा न घडावा मत्सर| वर्म सर्वेश्वर पूजनाचे|| तुका म्हणे एका देहाचे अवयव| सुखदुःख जीव भोग पावे||"**

हे जग विष्णू स्वरूप आहे. व भेद आणि तत्सापेक्ष अभेद सत्य वाटणे हा एक ओंगळ भ्रम आहे. असे ज्याला निश्चित ज्ञान झाले असेल त्यालाच वैष्णव म्हणावे. तोच वैष्णवांचा धर्म म्हणजे

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

वैष्णवांचे लक्षण आहे. हे साधक भागवत भक्त होत, तुम्हीही वैष्णवाचे लक्षण ऐका व जे तुम्ही स्वतःचे हित कराल ते खरे हित साधा आपल्याकडून कोणीही जीवाचा मत्सर घडू देऊ नये, कारण हेच सर्वव्यापक ईश्वराच्या पूजनाचे वर्म आहे. तुकाराम महाराज म्हणतात, जसे देहाच्या कोणत्याही एका अवयवाला सुखदु:खे झाली असता, ती देहात असणाऱ्या जीवाला प्राप्त होतात. तसे सर्व जग विष्णूमय असल्यामुळे जगातील कोणत्याही जीवाला सुखदु:खे दिल्यास ती ईश्वराला प्रम्त होतात. म्हणून साधक भक्तांनी जग विष्णुमय आहे. असा भाव ठेवून निर्मत्सर वैष्णव व्हावे. हे विश्वबंधुत्वाचे विचार आजच्या काळातही किती प्रासंगिक आहेत. हे लक्षात येते.

जाती-- जातीतील भेद नष्ट करण्याचा प्रयत्न आपल्या विचारातून संतांनी केला. भेदाभेद भ्रम अमंगळ म्हटले. सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने कसे राहतील याचा विचार मांडला सामाजिक समता व समरसता येण्यासाठी परंपरा, परोपकारिता, नम्रता हे गुण मांडले.

**“भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग| ज्ञान ब्रह्मी भोग ब्रम्ह तनु|| देहाच्या निरसने पाविजे या ठाया| माझी ऐसी कायाजवनव्हे|| उदक अग्नी धान्य झाल्या घडेपाक| एकविण एक कामा नये| तुका म्हणे मज कळते चांचणी| बडबडीची वाणी अथवा सत्य||”**

भगवद्दृष्टीने भूतमात्रांना नमस्कार करणे अथवा हरिनामसंकीर्तन करणे याला भक्ती म्हणतात. सर्व भोगासह अहंकाराचा त्याग करणे याला वैराग्य म्हणतात आणि ब्रह्मानंदाचा अनुभव प्राप्त होऊन शरीर ब्रह्मरूप होणे याला ज्ञान म्हणतात. देहाच्या ठिकाणी असलेल्या अहंभावाचा निरास झाल्यानेच वरील लक्षणाची भक्ती, वैराग्य आणि ज्ञान प्राप्त होऊन या ब्राह्मी स्थितीला प्राप्त होता येते. जोपर्यंत 'माझा' देह किंवा 'मी देह' अशी समजूत आहे तोपर्यंत ही स्थिती प्राप्त होत नाही. पाणी विस्तवआणि धान्य हे तीनही असतील, तरच स्वयंपाक तयार होतो. त्याप्रमाणे संत व्हायचे असेल, तर वरील लक्षणांची भक्ती, वैरागी आणि ज्ञान हे तीनही असणे आवश्यक आहे. एक आहे आणि दुसरी किंवा तिसरी नसेल, तर उपयोगाला येत नाही. तुकाराम महाराज म्हणतात, कोणी जर भक्ती, वैराग्य आणि ज्ञान यासंबंधाने माझ्यापुढे प्रवचन करू लागला, तर त्याची ती पोकळ बडबड ! का खराच त्याला तसा अनुभव प्राप्त झाला आहे. ही परीक्षा करण्याचे मला चांगले कळते. असे तुकाराम हा कालसंवादी, व्यवहार्य विचार मांडतात. त्यांच्या भक्तीत व्यवहाराचे अंग आहे. भक्तीला नीतीची जोड आहे. नम्र म्हणजे संपूर्ण सृष्टी भगवंत स्वरूप आहे संताचे विचार कोणत्याही कालातीत, देशातीत आहेत. राग, द्वेष, काम, इच्छा विधीने पूर्ण करण्याचे ठराविक प्रयत्न ठीक आहे धर्म, अर्थ काम, मोक्ष हे पुरुषार्थ आहेत. इच्छा-- आकांक्षा धर्म सोडून, विधीचा त्याग करून पूर्ण करायच्या हे कशामुळे घडते तर हे कामामुळे घडते. त्यामुळे तुकारामांचे विचार आजही आवश्यक आहेत.

आज जगात हिंसा वाढलेली आहे. कामामुळे व्यभिचार, हिंसाचार, भ्रष्टाचार हे काम,क्रोध, लोभ यामुळे घडतात. कोणत्याही काळात हे विकार माणसाच्या अंतःकरणात असतात. म्हणून संतांचे विचार काल आणि आज आणि उद्याही लागू पडतात. संतांनी सांगितलेले मूल्यकालातीत देशातीत आहेत. हे संतांचे कालसंवादी विचार प्रत्येक काळात लागू आहेत.ही मूल्य समाजात रुजली, तर समाज गुण्यागोविंदाने नांदतो. भगवद्प्राप्ती हे अंतिम सत्य आहे. तरच जीवाला सुख व समाधान मिळेल.

**संत तुकारामांच्या अभंगातील कालसंवादी रचनात्मक आणि व्यवहार्य विचारांची प्रासंगिकता**

**प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे,**

**“रूप पाहता लोचणी| सुख झाले हो साजणी|| सर्व सुखाचे आगरू|**
**बाप रखुमादेवीवरू|| तो हा विठ्ठल बरवा| तो हा माधव बरवा||”**

सुख म्हणजेच परमात्मा होय. हे सुख भगवंताचे स्वरूप आहे. त्यासाठी भक्ती हा सोपा मार्ग संतांनी सांगितला. क्रियामन, कर्माला प्राधान्य द्यावे. कर्माच्या जोरावर जगात कोणतीच गोष्ट अशक्य नाही."असाध्यते करिता सायास" प्रयत्नवादाचा पुरस्कार संतांनी केला आहे. प्रारब्धाला महत्त्व संतांनी दिले नाही. क्रियेमाण कर्माच्या आधारेआपले जीवन यशस्वी व आनंदी बनू शकतो. आळशीपणाला, आयतखाऊवृत्तीला तुकाराम महत्त्व देत नाहीत प्रयत्नवादी व्यक्ती जीवनात यशस्वी होतो. व्यवहार्य विचाराला तुकारामांनी महत्त्व दिले आहे.

सदाचार, सद्‌विचाराला प्राधान्य तुकारामांनी दिले आहे.

**“जोडोनिया धन उत्तम व्यवहारे| उदास विचारे वेच करी|| उत्तमचि गती तो एक पावेल| उत्तम भोगील जीवखाणी|| परउपकारी नेणे परनिंदा| परस्त्रिया सदा बहिणी माया|| भूतदया गायी पशूंचे पाळण|तान्हेल्या जीवन वनामाजी|| शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट| वाढवी महत्त्व वडिलांचे|| तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ| परमपद बळ वैराग्याचे||”**

जो मनुष्य धर्म- नीतीला अनुसरून उत्तम व्यापार, उत्तम शेती किंवा इतर धंदा करून धन मिळवतो आणि निष्कामबुद्धीने देश- कालपात्रांचा विचार करून ते खर्च करतो. तोच एक धनिक सदतीला प्राप्त होईल आणि तो पुढे मनुष्य जातीत उत्तम कुळामध्ये जन्माला येऊन पुष्कळ सुखभोगील. जो दुसऱ्यावर काया-वाचा- मनाने सर्वकाळ उपकार करतो; व दुसऱ्याची निंदा करणे ज्याला ठाऊक नाही. परस्त्रिया ज्याला आई- बहिणीसारख्या वाटतात, ज्याच्या अंतःकरणात भूतदया आहे. गाई व इतर पशुंचे जो पालन करतो, आरण्यामध्ये तहान लागलेल्या जीवांना जो पाणी पाजतो. जो शांत राहून कोणाशीही वाईटपणाने वागत नाही आपल्या वडिलांचे जो महत्व वाढवितो. तुकाराम महाराज असा आचार असणे हेच गृहस्थाश्रमाचे खरे फळ आहे या आचाराने वैराग्याचे अभंग बळ प्राप्त होऊन परमपदवाच्य जो मोक्ष त्याची प्राप्ती होती. त्याचबरोबर पराविया नारी रुक्मिणी मातेसमान मानतो. हे विचार आजही समाजाला उपयुक्त आहेत. आजही दांभिकता वाढली आहे. तुकारामांचे विचार कालसंवादी आहेत. भौतिक प्रगती होऊन उपयोग नाही, तर मनोमय सृष्टीतील विकार नाहीसे होणे आवश्यक आहे. संतांचे विचार हे वाईट घालविण्यासाठी समाजाला आजच्या एकविसाव्या, जागतिकीकरणात, यंत्रयुगात, संगणक, मोबाईलच्या युगात उपयुक्त आहेत संत ज्ञानेश्वरांनी "वर्षत सकळ मंडळी, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी" असे पसायदानातून विचार मांडले आहेत. आचरणात परिवर्तन होण्यासाठी आवश्यक आहेत. जो काही समाजात सध्याच्या काळात चांगुलपणा शिल्लक उरला आहे. ती संतांच्या विचारांची देण आहे. सत्य, परोपकार, अहिंसा हे विचार संतांनी दिले आहेत. त्याची आज प्रासंगिक गरज आहे. म्हणून संत तुकाराम महाराजांचे विचार कालसंवादी, व्यवहार्य आजही आहेत.

वाडवडिलांची सेवा हे ग्रहस्ताश्रमाचे फार मोठे श्रेष्ठ अंग आहे. तुकोबा सांगतात. **“मायबापे केवळ काशी|तेने न वजावे तीर्थासी|| पुंडलिके काय केले| परब्रम्ह उभे ठेले|| तैसा होई सावधान| ह्रदयी**

**धरी नारायण|| तुका म्हणे मायबापे| अवघी देवाची स्वरूपे||"** आई वडील म्हणजेच वाराणसी. जो हे मानतो त्याने तीर्थक्षेत्रास जाऊ नये. भक्त पुंडलिकाने काय केले ! परब्रम्ह विटेवर उभे केले. तरी तू सावध हो आणि भगवंतास अंतःकरणात ठेव. तुकाराम महाराज म्हणतात, आई-वडील ही भगवान आणि लक्ष्मीची रूपे आहेत. हे आजच्या तरुण पिढीने संत तुकारामांचे विचार लक्षात ठेवणे आवश्यक आहे. द्रव्यलोभामुळे माणसाच्या मागे काळ लागतो."द्रव्याचियामागे कळी काळाचा लाग" द्रव्याला तुकारामांनी नरकाचे मूळ म्हटले आहे. मानवाने अशा द्रव्याच्यामागे कधीही लागू नये. हेच तुकोबांचे सांगणे आहे. ज्याला परमेश्वर प्राप्तीची अपेक्षा आहे. त्याने अर्थामागे धावू नये."सर्वस्वा मुकावे तेणे हरि जिंकावे| अर्थ प्राण जीवे देह त्याग ||" तुकारामांच्या या सांगण्यामागे फार गंभीर आशय दडला आहे. जो मनुष्य केवळ अर्थप्राप्तीच्या मागे लागतो. त्याच्या ठाई काम, क्रोध, लोभ, मोह,मंद, मत्सर ,अहंकार, ममता, माया असे दुर्गुण आपोआपच निर्माण होतात शांती, क्षमा व दया असेविचार माणसांच्या जवळ येण्यासाठी संतांचे विचार उपयुक्त आहेत. अधिक पैसे मिळविण्यासाठी चिंता व पैसे जाण्याचे भय यानेच माणूस गाजून जातो तुकारामासारखे संत अशा द्रव्याचा विटाळ मानतात. खरे धन एकच असते ते म्हणजे परमार्थ साधनाचे किंवा भक्तीचे होय."तुका म्हणे घेई राहे ऐसे धन । सादर श्रवण करोनिया||" संपत्तीला जग नमस्कार करते; परंतु धन, स्थावर- जंगम हे अश्वासत आहे. फक्त संतांचे विचार महत्त्वाचे आहेत. रावणाच्या लंकेत सात कोटी सोन्याची घरे होती; पण मरताना एक कवडीही त्याला बरोबर नेता आली नाही. असे तुकोबा म्हणतात, ज्याला परमार्थ साध्य करावयाचे आहे. त्यांनी विषयावर पूर्ण मात केलीच पाहिजे. याचा अर्थ पंचन्द्रियांचे विषय पूर्णतः टाकावीत असे नव्हे, तर धर्मयुक्त व विधीयुक्त राहून त्यांचे सेवन करावे असा त्याचा अर्थ होईल. जोपर्यंत विषयांवर उपासकाला विजय मिळवता येत नाही, ज्याचे मन चंचल आहे. त्याला भक्ती करता येणे शक्य नाही. कारण भक्तीसाठी देहाविषयी भक्तीची वृत्ती उदासीन असावी लागते ज्याला सुखोपभोगाची चटक आहे. तो उदासीन राहू शकत नाही जो उदासीन होऊ शकत नाही. तो निर्भयसुद्धा होऊ शकत नाही.भित्र्या माणसाला परमार्थाची वाटचाल कधीही करता येत नाही. अर्थातविषयत्यागाने विधियूक्त आचरण, विधियूक्त आचरणाने मनोविजय, मनोविजयाने वृत्तीची उदासीनता, उदासीनतेने निर्भयता व निर्भयतेने भक्ती अशी मालिका आहे. या माळेतील एकही म्हणी उपासकाला बाजूला काढून टाकता येत नाही.

म्हणूनच जो बाईलवेडा आहे त्याचे जिने तुकारामांना व्यर्थ वाटते"देवब्राह्मणासी जाईना शरण । दासीचे चरण वंदी भावे||" अशी बाईलवेड्याची अवस्था असते."तारुण्याच्या मदे न मानी कोणासी । "असा त्याला माज आलेला असतो. अशा माणसाला लोकात मान मिळत नाही, व परलोकातही स्थान असत नाही. ज्याचे चित्त व मन लोभावर असते, ज्याच्या हातून अतिथीपूजन होत नाही, ज्याला आळस, झोप व भूक फार असते, त्याच्या मनाला वैराग्याचा विचार शिवत नाही. अशा पतीत माणसाला साधूत्व कधीही स्पर्श करत नाही. "तुका म्हणे धिंग ऐसे झाले लोक| निंदक वादक नरका जाती||" जो विषयलंपट आहे, त्याला तुकोबांनी जन्मोजन्मीचा अधम म्हटले आहे. विषय सुखाचा लंपट| तयाचा तेची वाट| अधोगती जावया||'

तात्पर्य, असे की, विषयाच्या अतिरिक्त सेवनाने नरदेहाचा नाश न करता धर्माच्या चौकटीत अर्थ व काम सेवन करण्यासाठी तुकोबा सांगतात. अन्यथा माणसे भक्ती व भजन पैशासाठी करतात. भोगासाठी करतात. तुकारामांनी अशा साधुत्वाचा धिक्कार केला आहे संत तुकारामांचे हे विचार सध्याच्या काळातील साधू, ढोंगी यांना लागू पडतात."नाही वैराग्याचा लेश। तीर्थचाड जावे आस ।।" अशा माणसाला काही प्राप्त होत नाही. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणे "हे नातेंसेंजालें । तुका म्हणें वांया गेले ।।" यासाठी परमेश्वराचे अधिष्ठान निर्माण करून अर्थ, कामाला लगाम लावूनच परमार्थाची वाटचाल आजच्या साधकाने केली पाहिजे. यासंदर्भात तुकारामांनी आजच्या उपासकाला एकच इशारा दिला आहे, तो काल संवादी आहे. **"तुका म्हणे ऐसे| मना लावी रामपिसे|| नाहीतरी आलिया सायासे| फुकट जासी ठकोनी||"** कामावरील उतारा मोक्ष आहे.

**सारांश:-**

अशाप्रकारे तुकारामांनी आपल्या शब्दब्रह्मात, उपदेशात व व्यवहारात कशी आचरली हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. म्हणूनच "वाचा बोलू वेदनीती । करू संती केले ते ।।" असे तुकोबांनी म्हटले आहे. याचा अर्थ असा की, ज्ञानेश्वरापासून तुकारामांच्या कालखंडापर्यंत झालेल्या सर्वच संतांनी वेदाचा धर्म व वेदाची नीतीच निष्ठेने आचरली व उपदेशातील आहे. अर्थात जे ज्ञानेश्वरांनी सांगितले, शिकविले तेच तुकारामांनी सांगितले. त्यातच भागवतधर्माचे सर्व सार साठविलेले आहे. तुकोबा म्हणतात, तेच खरे "शिकवूनि हित| सोयी लावावे हे नीत||" समाजाला हिताचे शिकवून सन्मार्गाला लावणे, हीच खरी नीती, विचार कालसंवादी आणि व्यवहार्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) ह. भ. प. वै. शंकर महाराज खंदारकर,'श्रीतुकाराममहाराजगाथाभाष्य', खंड १ व २',वै. शंकर महाराज खंदारकर विश्वस्त संस्था, औरंगाबाद, आवृत्ती नववी,२०१२

२) ह. भ. प. -ल. रा. पांगारकर,'संत तुकाराम चरित्र', वरदा प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती, २०२२

३) शंकर वासुदेव अभ्यंकर,'संत तुकाराम', आदित्य प्रतिष्ठान, पुणे, द्वितीय आवृत्ती,२००८

४) रामचंद्र झाडे,'संत तुकारामांचा साहित्यिक व सांस्कृतिक जनसंवाद,' स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती,२०१३.